# प्रकरण तिसरे

# प्रकरण तिसरे

# संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे सिंहावलोकन

३.१ प्रस्तावना

३.२ संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे सिंहावलोकन

३.३ समारोप

# प्रकरण तिसरे

# संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे सिंहावलोकन

## ३.१ प्रस्तावना

प्रस्तुत संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे समालोचन करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे संशोधकाला तुलनात्मक माहिती, उचित संशोधन पध्दती आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते. विविध संशोधकानी भाषेतील अडथळे व संप्रेषणाविषयी केलेल्या संशोधनाविषयी काही निष्कर्ष काढले आहेत. त्या निष्कर्षाचा उल्लेख करुन शेवटी आपले मत व्यक्त केले आहे.

## ३.२ भानुशाली एस्. जी. (१९८०)

मुंबई विभागातील ५ व्या इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे हिंदी शब्द संग्रहाविषयीचे संशोधन केले आहे. त्यांनी काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे -

१. सदर वर्गाच्या पाठयपुस्तकामध्ये सुमारे ५८ ते ४८ टक्के इतक्या शब्दांची माहिती विद्यार्थ्यांना आहे.

२. काही शब्द संस्कृत भाषेतून आलेले आहेत. तर काही पार्शियन भाषेतून आले आहेत.

## ३. पटेल एम्. एम्. (१९८१)

सातवीतील विद्यार्थ्यांना मातृभाषेतील विचार व्यक्त करण्यासाठीच्या विविध योजना विकसित करणे.

**निष्कर्ष**

१. लेखन व अभिव्यक्ती या विषयीचे उपलब्ध ज्ञान व तंत्रे योग्य नव्हती.

२. फार थोडया शाळांमधून लेखन व अभिव्यक्ती यातील कौशल्य वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले दिसून आले.

**३. जैन एन्. (१९८१)**

"राजस्थानमध्ये उच्च माध्यमिक शाळेत नविन हिंदी पद्य अध्यापनाच्या दृष्टिकोनातून संप्रेषण क्षमतेचे परिक्षण"

या संशोधनाचे उद्देश -

१. नविन हिंदी पद्याचे अभ्यासक्रमामध्ये स्थान शोधणे.

२. नविन हिंदी पद्याचे अध्यापन करतेवेळी प्रशिक्षणार्थीना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे.

३. नव्या पद्य अध्ययन अध्यापनामध्ये येणारी प्रात्यक्षिक समस्या शोधणे.

४. नविन पद्य रचनेविषयी येणाऱ्या समस्या शोधणे.

या संशोधनामध्ये काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढलेले आहेत. ते खालीलप्रमाणे -

१. शाळेच्या अभ्यासक्रमामध्ये नविन हिंदी पद्याचे स्थान नगण्य आहे.

२. संपादकाच्या दृष्टिकोनातून नविन पद्य समजण्यास सोपे आहे. तरीसुध्दा त्याचा अर्थ आकलन होण्यास विद्यार्थ्यांना काही अडचणी येतात.

३. ९० टक्के विद्यार्थ्यांना पद्यापेक्षा गद्य अधिक आवडते.

४. नविन पद्याचे अध्ययन अध्यापनाची मुख्य समस्या पद्य प्रकार आहे. त्यांच्या दृष्टिकोनातून या कवितेच्या ओळी क्रमबध्दरीतीने लिहिल्या असतील तर त्याला पद्याचे रुप देता येत नाही.

**५. पटेल एम्. एम्. (१९८१)**

"मातृभाषेच्या विचारांची अभिव्यक्तीमध्ये सुधारणा आणणारी योजना किंवा विकास करणे" या नावाचे संशोधन केले आहे. यामध्ये खालील उद्देश सांगितले आहेत.

**उद्देश**

१. लिखित अभिव्यक्ती तंत्राच्या संदर्भात अनेक मूल्यमापन तंत्राचे स्थान निश्चित करण्याविषयीचे अध्ययन करणे.

२. लेखन अभिव्यक्ती दुरुस्त करुन त्यामध्ये सुधारणा करणे. या दोन संकल्पना स्पष्ट करणे.

३. लिखित अभिव्यक्तीमध्ये विचारांच्या अभिव्यक्तीला लिखित रुपात सुधारणा तसेच त्यासाठी प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यासाठी योजना तयार करणे.

४. या अभिव्यक्तीच्या विचारामध्ये सुधारणा करण्यासाठी योजना विकसित करणे.

या संशोधनातून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढलेले आहेत. ते खालीलप्रमाणे -

**निष्कर्ष**

१. लेखन अभिव्यक्तीचे नियोजन तसेच अध्यापन तंत्र योग्य नव्हती.

२. ही योजना केवळ लेखन अभिव्यक्तीमध्ये होणाऱ्या चूका दूर करण्यासाठी होती. यामध्ये होणाऱ्या चूका सुधारण्यासाठी नव्हती.

३. गुजराती प्रशिक्षणार्थींचे अध्ययन कार्य अन्य विषयाच्या प्रशिक्षणार्थीपेक्षा अधिक होते.

४. खूप कमी शाळांमध्ये सृजनात्मक लेखन विकासावर ध्यान दिले गेले.

५. लिखित अभिव्यक्तीमध्ये होणाऱ्या मूळ अभिव्यक्तीच्या विचाराचा प्रसार करण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांजवळ कोणती योजना नव्हती.

६. लिखित पाठयक्रमामध्ये विचाराच्या सुधारणामध्ये नविन योजनेबद्दल प्रशिक्षणार्थ्यांचा दृष्टिकोन सकारात्मक होता.

५. **डेनम्मा के. व्ही. (१९८२)**

"वर्गातील विचारांच्या अभिव्यक्तीतील शाब्दिक अडथळे"

**उद्देश**

१. शास्त्रीय अभिव्यक्तीतील उच्चारणातील अडचणी व संदिग्धतेतून निर्माण झालेल्या अडचणी व गोंधळ याविषयीचा अभ्यास करणे.

२. रसायनशास्त्राच्या मल्याळम भाषेतील प्रमुख तांत्रिक शब्द समजावून घेताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. विचारांच्या अभिव्यक्तीच्या विविध ११ तंत्रांचा अवलंब केला. त्यात शब्दोच्चारण व त्यांची अभिव्यक्तीची शक्यता यावरील प्रभाव महत्त्वाचा होता.

**६. सिंग व्ही. डी. (१९८४)**

"इंग्रजी शिकविणाऱ्या शालेय शिक्षकांची विषय अभिव्यक्तीची क्षमता व त्यांचे इतर शैक्षणिक कार्य यांचा अभ्यास"

**निष्कर्ष**

१. शब्दोच्चारण ७५ टक्के उदाहरणात समाधानकारक होते. शुध्दतेच्या दृष्टीने ते अपुरे होते.

२. विद्यार्थ्यांच्या शब्दविषयक तक्रारी सोडवण्याची क्षमता समाधानकारक होती. पण महत्त्वाच्या चूकांचे स्पष्टीकरण करणे ही शैली सदोष होती.

**७. प्रताप डी. जी. (१९८५)**

"इंग्रजी व मराठी या भाषातील व्याकरण संरचनेचा विधायक विचार"

१. शब्दांची अभिव्यक्ती व्युत्पत्ती व रचना या बाबतही इंग्रजी भाषेत संगती आढळून आली.

२. इंग्रजी भाषेची तुलना केली असता मराठी भाषेतील प्रश्नांची रचना साधी व सोपी होती.

## ८. सरकार एम्. डी. व सिंग आर. के. (१९९३)

"शिक्षणातील संप्रेषणासाठी लेखन व परस्पर क्रिया दृष्टिकोन" या संशोधनातील काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष खालीलप्रमाणे -

परस्पर क्रिया-प्रक्रिया दृष्टिकोन विद्यार्थ्यांना केवळ लेखनातील समस्यांच्या विषयी आत्मपरीक्षणासाठी केवळ सहाय्यता करुन उपयोग नाही तर त्यांना शास्त्रीय व तांत्रिक संभाषण कार्यक्षमता व निरीक्षक सुध्दा मदत करतात. ज्या प्रकारे विद्यार्थ्यांना वाटते की, आपले विचार लिहित असताना लेखनामध्ये व्यवस्थापनाची कला पाहावयास मिळते. त्याप्रमाणे जे प्रशिक्षणार्थी असतात त्यांना नियोजन योग्य प्रकारे करण्यासाठी दृश्य अनुभवाच्या रुपात मदत करतात.

## ९. शुक्ला आर. पी. (१९९४)

"व्यवहारामध्ये अध्ययन अध्यापन प्रक्रियेची कृतीशिलता व परिणाम" या संशोधनातून काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढलेले आहेत ते खालीलप्रमाणे -

अध्यापकांनी उच्च शिक्षण स्तरावर कोणत्याही घटकासाठी संप्रेषण कौशल्यावर प्रभुत्व मिळविले पाहिजे.त्याचबरोबर उच्च शिक्षणाच्या हेतूसाठी व्यावहारिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी, स्वभाव, अभिरुची याविषयी माहिती घेणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थीनी व्यावहारिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेचा स्वीकार करण्यासाठी तसेच त्याचा वापर करण्यासाठी खालील गोष्टी विचारात घ्याव्यात.

१. अध्ययन आणि अध्यापनातील संभाषण प्रत्यक्ष व्यवहारासाठी होते हे समजावून घेणे आवश्यक आहे.

२. संभाषण प्रक्रियेचे मूलभूत ज्ञान असले पाहिजे.

३. घटकावर प्रभुत्व मिळविणे तसेच विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी स्तर जाणून घेणे आवश्यक आहे.

४. अध्ययन अध्यापनामध्ये विद्यार्थ्यांबरोबर सहकारी अशी भूमिका ठेवावी.

५. वेगवेगळया क्षेत्रात सुशिक्षित व्यक्तीच्या सहाय्याने आदान-प्रदान करण्यास विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे.

६. विद्यार्थ्यांना स्वतःचा ग्रंथभंडार विकसित करण्यासाठी त्यांना ग्रंथवाचन करण्यास प्रेरणा दयावी.

## ३.३ समारोप

वरील साहित्याच्या निष्कर्षावरुन हे दिसून येते की, जो संशोधन विषय निवडलेला आहे असा विषय यापूर्वी घेतलेला नाही. वरील संशोधन विषय तसेच निष्कर्ष पाहिल्यानंतर संशोधिकेने हा विषय घेण्याचा निर्णय घेतला. मराठीच्या प्रशिक्षणार्थ्यांना येणाऱ्या भाषिक अडथळयांचा परिणाम संप्रेषणावर कोणत्या प्रकारे होतो व त्यावर योग्य त्या उपाययोजना करणे.

पुढील प्रकरणामध्ये संशोधनाची कार्यपध्दती तसेच संशोधनासाठी उपयोगात आणलेली साधने, गणितीय तंत्र याचा विचार केला आहे.